# प्राजक्त

संस्थापक व आद्य संस्थापक : स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी

वर्ष : ४२ अंक : फोन : ०२३१-२५४०४२७

कोल्हापूर ता. जुलै ८, २०१३ किंमत २ रुपये

Reg. No. GR/RNP/KLP 136/09-11 Posted in Kolhapur

# आम्ही भिडे

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान (खासगी वितरण)

अंक १६ वा जुलै २०१३

वर्ष तिसरे, त्रैमासिक क्र. २

Website : www.bhidekul.in

Email: office@bhidekul.in


## ‘आम्ही भिडे’ चे प्रकाशन - कल्याण

जुलै २०१३ च्या आम्ही भिडे त्रैमासिकाचे प्रकाशन कल्याण येथे करावे असे भिडे प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळात ठरले. त्याला कल्याणच्या श्री. अरविंद व प्रभाकर भिडे यांनी पाठिंबा तर दिलाच तसेच समारंभाची सर्व जबाबदारीही स्वीकारली.

आम्ही भिडे त्रैमासिक अंक दर वेळेला वेगवेगळ्या गावी प्रकाशित करावा अशी मूळ संकल्पना आहे. त्या दृष्टीने आतापर्यंत पुणे, सांगली, ठाणे, सातारा येथे अंक प्रकाशित झाले आहेत. प्रकाशनाचे निमित्ताने आपोआप तेथील भिडे मंडळी एकत्र येतील व त्यांच्यात सौहार्द निर्माण होईल या दृष्टीने कल्याणला २८ जुलै २०१३ रोजी प्रकाशन होत आहे. या प्रकाशन समारंभाच्या निमित्ताने कल्याणचे ऐतिहासिक महत्त्व सांगणारा लेख या अंकात समाविष्ट करण्यात आला आहे.

**दहावी व बारावीच्या परीक्षेमधीलसर्व यशस्वी भिडे विद्यार्थी-विद्यार्थिनींचे हार्दिक अभिनंदन !**

## गुणवंत भिडे आवाहन

एखाद्या व्यक्तीचे काम प्रशंसनीय असूनही अशी व्यक्ती माहिती अभावी शाबाशी अथवा पुरस्काराने सम्मानित झाली नसेल तर अशा व्यक्तीच्या कार्याची माहिती फोटो व पत्त्यासह आम्हास जरूर कळवा. अंकातील उपलब्ध जागेनुसार यथोचित प्रसिद्धी दिली जाईल.




**कै. दामोदर (दामूकाका) केशव भिडे**

**दि. ११ ऑगस्ट २०१३**

**प्रथम पुण्यस्मरण**

## दातृत्व

ज्या माता-पित्यांनी आपणांस लहानपणापासून शिक्षणाकरिता सतत पाठीशी उभे राहून प्रोत्साहन दिले, अशा माता-पित्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या शैक्षणिक निधी करिता श्री. प्रदीप वासुदेव भिडे (खअड), आणि त्यांच्या पत्नी डॉ. सौ. शीलाताई भिडे (खअड), सध्या राहणार दिल्ली, या दाम्पत्याने रु. ५ लाख प्रतिष्ठानकडे सुपूर्त केले आहेत.



भिडे कुलोत्पन्नांतील गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनी, आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी ही मदत आहे. या कायम स्वरूपी मदत निधीच्या येणाऱ्या व्याजातून ही मदत दरवर्षी करावी असे या दाम्पत्याने सुचविले आहे. गरजू व गुणवत्ता प्राप्त शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी यासाठी प्रतिष्ठानकडे अर्ज करावा.

शिक्षण घेणारा विद्यार्थीवर्ग आर्थिक ओढाताणीमुळे शिक्षणापासून वंचित राहता कामा नये, हा उदात्त व विशाल दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून या दाम्पत्याने सामाजिक बांधिलकीचे उदाहरणच घालून दिले आहे. धन्य ते माता-पिता की ज्यांनी यांना जन्म दिला आणि अशा विचारांचे संस्कार यांच्यात रुजविले.

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा.**

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, मुंबई
(ई - २०१४० (मुंबई) दि. १६ एप्रिल २००२)

# वार्षिक सभेची सूचना

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या सभासदांची तेरावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २० ऑक्टोबर २०१३ रोजी सायंकाळी ४:३० वाजता खालील ठिकाणी भरेल. सर्व सदस्य भिडे कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणींनी सभेला वळेवर हजर रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय :**

**१) स्वागत व प्रास्ताविक**

**२)बाराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त व मान्यता**

**३) वार्षिक अहवाल आणि ३१ मार्च २०१३ रोजी संपलेल्या वर्षाच्या हिशोबपत्रकांना मान्यता.**

**४) सन २०१३-१४ वर्षासाठी हिशेब तपासनिसाची नेमणूक**

**५) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे अन्य विषय**

**विशेष सूचना :** १) गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास तहकूब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी वरील कामकाजासाठी अर्ध्या तासाने सुरू होईल व अशा सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही. २) सभासदांना काही प्रस्ताव सूचना, स्पष्टीकरण इ. आवश्यक असेल तर त्यासंबंधी त्यांनी लेखी स्वरूपात ५ ऑक्टोबर २०१३ पर्यंत प्रतिष्ठानच्या पुणे कार्यालयात विचारणा करावी त्यामुळे आवश्यक ती माहिती सभेच्या वेळी तयार ठेवता येईल.

**कार्यकारिणीच्या आदेशान्वये**
**प्रभाकर शं. भिडे, चिटणीस**

**सभेचे स्थळ : श्री. सुनील भिडे, २१, 'हार्मनी', लेन नं. ४-ब, दि. ब. देवधर मार्ग, पी. वाय. सी. क्लब समोर, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४. (९६५७५४१२३६)**

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
पुणे कार्यालय : ९२, शुक्रवार पेठ, रंजन को.-ऑप. हौसिंग सोसायटी, मंडई गणपती जवळ, पुणे - ४११ ००२
फोन : दिलीप भिडे ९६५७५४१२३६

❖ पत्रव्यवहारासाठी पत्ता ❖
**विनायक वि. भिडे**
५५३, नारायण पेठ, माती गणपती जवळ, भिडे वाडा, पुणे ४११ ०३०.
फोन - २४४५३२७४ मोबा : ९५५२२ १६९६७

आम्ही भिडे (अंक १२ वा)
**संपादक मंडळ**
संपादक - श्री. शशिकुमार केशव भिडे.
कार्यकारी संपादक - श्री. चिंतामणी भिडे
संपादक मंडळ - श्री. प्रभाकर भिडे, श्री. दिलीप भिडे, श्री. श. ह. भिडे, ले. कर्नल (नि.) सुनील वा. भिडे, सौ. प्रिया भिडे, श्री. विजय अ. भिडे
**सल्लागार मंडळ -**
श्री. सुनील भिडे (अभिरुची), श्रीमती शशिताई घुले, श्री. अरविंद भिडे, श्री अजय भा. भिडे
अक्षर जुळणी - श्री. विनायक भिडे (पुणे)

## भिडे प्रतिष्ठान तर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

जुलै

१) श्री. विवेक वसंत भिडे, रत्नागिरी - - -२
२) श्री. शशिकुमार केशव भिडे, पुणे - - - - २
३) कु. समीर सुधीर भिडे, ठाणे - - - - - ०५
४) श्री. रामचंद्र काशिनाथ भिडे, - - - - - ७
५) श्रीमती विमल रघुनाथ घाणेकर, पुणे - -०८
६) श्री. वसंत सदाशिव भिडे, बोरिवली - - १५
७) सौ. सुनंदा दिलीप भिडे, मुंबई - - - १६
८) श्री. वासुदेव परशुराम भिडे, डोंबिवली - १७
९) श्री. अनील वामन भिडे, पुणे - - - - - १७
१०) श्री. अशोक पुरुषोत्तम भिडे, पनवेल - - २०
११) श्री. विनायक व्ही. भिडे, डोंबिवली - - २१
१२) सौ. अस्मिता प्रवीण भिडे, गोवा - - - २२
१३) कु. दिपांक्तिा सुनील भिडे, पुणे - - - -२३
१४) श्री. अरविंद विद्याधर भिडे, - - - - - -२३
१५) श्री. विनय विष्णू भिडे, पुणे - - - - २४
१६) सौ. स्मिता सतीष भिडे, मुंबई - - - - २७
१७) श्री. शंकर त्रिं. भिडे, पुणे - - - - -२८
१८) सौ. अनुराधा अविनाश भिडे, मिरज - - ३०
१९) श्री. तेजस श्रीकृष्ण भिडे, मालाड - - - ३०
२०) श्री. बळवंत भिडे, अमळनेर - - - - - २३

ऑगस्ट

१) सौ. मीरा मधुकर भिडे, गुजरात - - - -०३
२) श्री. विद्याकर वासुदेव भिडे, पुणे - - - -५
३) कु. सुबोध श्रीकांत भिडे, रोहा - - - - ६
४) श्री. श्रीकृष्ण रघुनाथ भिडे, पुणे - - - - -६
५) सौ. योगिनी माधव भिडे, पुणे - - - - ७
६) सौ. शिल्पा महेश जोशी, मुंबई - - - - ११
७) श्री. अमित दिलीप भिडे, पुणे - - - - १२
८) सौ. प्रसन्ना सुभाषचंद्र भिडे, पुणे - - - १४
९) कु. ऋता चिंतामणी भिडे, ठाणे - - १५
१०) ले. क. सुनील वासुदेव भिडे, पुणे - - -१५
११) डॉ. संदीप दत्तात्रय भिडे, गुजरात - - - १९
१२) सौ. सुजाता प्रदीप भिडे, पुणे - - - - - २१
१३) श्री. माधव पुरुषोत्तम भिडे, पुणे - - २१
१४) सौ. वंदना विवेक भिडे, दिल्ली - - -२१
१५) सौ. विद्या विश्वनाथ भिडे, पुणे - - - - २२
१६) श्री. निलेश अशोक भिडे, पनवेल - - - २६
१७) श्री. विवेक विजय भिडे, दिल्ली - - - - २६
१८) श्री. विनायक सखाराम भिडे, डोंबिवली -२७
१९) श्री. विजय रघुनाथ भिडे, ठाणे - - - - २८
२०) सौ. शर्वरी शिरीष शेवाळकर, पुणे - - - ३०
२१) श्री. गोपाळ अनंत भिडे, किहीम - - - -३१
२२) श्री. गोविंद काशिनाथ भिडे, सोलापूर - ३१

सप्टेंबर

१) कु. सुरभी राजेन्द्र भिडे, डोंबिवली - - - -१
२) श्री केदार प्रभाकर भिडे, डोंबिवली - - - २
३) श्री. प्रसाद वसंत भिडे, ठाणे - - - - - ३
४) सौ. वैजयंती रामचंद्र भिडे, कल्याण - - -३
५) श्रीमती संध्या त्रिंबक भिडे, पुणे - - - - -७
६) सौ. आरती अनंत भिडे, चिपळूण - - - ०७
७) सौ. अनुराधा गोविंद भिडे, सोलापूर - - ९
८) श्री. अमित अरविंद भिडे, पुणे - - १०
९) श्रीमती शशी मुरलीधर घुले, पुणे - - - ११
१०) श्री. अनंत शरद भिडे, चिपळूण - - - - १२
११) श्री. प्रवीण भिकाजी भिडे, गोवा - - - -१३
१२) श्री. श्रीराम श्रीपाद भिडे, चिपळूण - - - १५
१३) श्री. आनंद भिडे, मुंबई - - - - - - - १६
१४) सौ. कल्पना विनायक भिडे, धुळे - - - १८
१५) कु. प्रसाद केदार भिडे, डोंबिवली - - - १८
१६) श्री. विनायक विश्वनाथ भिडे, पुणे - - - १८
१७) कु. बागेश्री अविनाश भिडे, पुणे - - - २०
१८) श्रीमती ललिता र. वेलसकर - - - - - -२०
१९) सौ. रेणुका केदार भिडे, पुणे - - - - - २२
२०) श्रीमती वैशाली विलास भिडे, हैद्राबाद - २५
२१) कु. सारंग संतोष भिडे, ठाणे - - - - - २६
२२) कॅ. विवेक प्रभाकर भिडे, मुंबई - - - - २६
२३) श्री. रोहित विजय भिडे, ठाणे - - - - - -२७
२४) सौ. अपर्णा सुहास भिडे, सातारा - - - २९
२५) श्री. सुधीर गणेश भिडे, ठाणे - - - - - २९

# "मुंबईचे पहिले विभागीय संमेलन - २०१३"

दिलीप वासुदेव भिडे (पुणे)
मोबा. ९६५७५४१२३६

दिनांक ३१ मार्च, रणरणतं ऊन, दादरच्या कल्चरल सेंटरमध्ये नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान तर्फे मुंबई विभागीय संमेलनाचे आयोजन करण्यात आले. सातारा संमेलनात शेवटच्या सत्रात संमेलन स्थळ, संमेलन कसं साजरं करावं या विषयावर उपस्थित भिडे मंडळींचा एकमेकांचा संवाद, चर्चासत्र आयोजित केले होते त्यामध्ये २०१४ मध्ये डोंबिवली किंवा ठाणे येथे भिडे संमेलन होण्याचे फलदायी संकेत मिळाले. या चर्चेमध्येच वार्षिक संमेलनाव्यतिरिक्त गांव किंवा जिल्हा विभागानुसार संमेलनाचे आयोजन व्हावे या सूचनेची फलनिष्पत्ती म्हणजेच पहिले मुंबईचे ३१ मार्चला आयोजित केलेले विभागवार संमेलन. हे पहिले विभागवार संमेलन म्हणजे वार्षिक संमेलनाचा "ट्रेलर" झाला असे म्हणणे वावगे ठरणार नाही.



या संमेलनासाठी सर्वश्री प्रभाकरपंत, श्रीधर, अरविंद यांचे मार्गदर्शन तसेच प्रतिष्ठानचे माजी अध्यक्ष प्रदीप भिडे यांनी केलेल्या सूचना आणि संजय, अजय, विजय, चिंतामणी, चैतन्य तसेच सौ. संपदा व पूर्वाताई देवधर, सौ. मीनल या तरुण पिढीने अत्यंत कमी वेळात सर्वांशी संपर्क साधून त्याचे आयोजन यशस्वीरीत्या केले याबद्दल त्यांचे कौतुक करावे तितके थोडेच आहे.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. त्यानंतर या कार्यक्रमासाठी पुण्यातून आवर्जून आलेल्या सर्वश्री श्री शशिकुमार, दिलीप, ले. क. सुनील, विनायक, चैतन्य व प्रतिष्ठानचे अन्य पदाधिकारी व विश्वस्तांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले; त्यानंतर प्रसिद्ध निवेदिका व सूत्रसंचालनाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या, आणि 'आरसा' हा एकपात्री प्रसिद्ध असा कार्यक्रम सादर करणाऱ्या सौ. मंगलाताई खाडिलकर यांचा दोन तासाचा कार्यक्रम झाला. यामध्ये गानसम्राज्ञी लताबाई व आशाताई, पं. भीमसेन जोशी, पु. ल., सुलोचना चव्हाण, अमिताभ बच्चन संगीतकार वसंत पवार अशा दिग्गजांबरोबर सूत्रसंचालन/निवेदन करतांना आलेले अनुभव, किस्से त्यांनी कथन केले आणि उपस्थितांना दोन तास खिळवून ठेवले. त्यांची अमोघ वाणी, प्रसन्न व हसतमुख चर्या यामुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला.त्यानंतर "आम्ही भिडे" च्या १५ व्या अंकाचे प्रकाशन चेंबूरचे डॉ. दत्तात्रय विश्वनाथ भिडे यांचे हस्ते झाले. आम्ही भिडेच्या १५ व्या अंकाचे कार्यकारी संपादक श्री प्रभाकरपंत हे उपस्थित नसल्यामुळे प्रकाशन समारंभाची सूत्रे दिलीप भिडे यांचेकडे आली. प्रकाशन सोहळ्या दरम्यान प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. माधवराव भिडे यांनी व्हेंचर फंडाची इच्छा लोकांसमोर प्रदर्शित केली. त्यानंतर कार्याध्यक्ष श्री. शशिकुमार भिडे यांनी या फंडाबद्दल लेखापरीक्षकांशी चर्चा करून योग्य तो निर्णय कार्यकारिणी घेईल असे सांगितले. अंकाबाबत बोलताना श्री. दिलीप भिडे यांनी अंकातील सदरांबाबत आणि स्वरूपाबद्दल विवेचन केले. खरंतर या विभागीय संमेलनामध्ये १५ व्या अंकाचे प्रकाशन पूर्वनियोजित नव्हते तरीसुद्धा थोड्या वेळात आणि आटोपशीर असा प्रकाशन सोहळा पार पडला. त्यानंतर १५ मिनिटांच्या मध्यंतरात खमंग बटाटेवडा आणि वाफाळलेल्या चहाचा आस्वाद घेत-घेत अर्धा ते पाऊण तासाचा एकमेकांशी ओळख व गप्पांचा कार्यक्रम झाला.

शेवटच्या सत्रात मुंबईतील भिडे बंधु-भगिनी व माहेरवाशिणींनी तयार केलेला सुगम संगीताचा कार्यक्रम सादर झाला. त्यामध्ये श्री. अरविंद व सौ. मीनल या भिडे उभयतांनी खूप मेहनत घेऊन एक बहारदार कार्यक्रम सादर केला. त्यामध्ये जेष्ठ कुलबंधू श्री. यशवंतराव भिडे यांच्या पेईंग गेस्ट मधील 'माना जनाबने पुकारा' आणि 'वक्त' मधील 'ए मेरी जोहरजबी' या कव्वालीने 'वन्समोअर' मिळविला तर ज्येष्ठ भगिनी लीना व विजयाताई भिडे यांनी वयाच्या ६० व्या वर्षानंतर सुद्धा एकापेक्षा एक अशी सरस गाणी गाऊन प्रेक्षकांची वाहवा मिळविली. खरोखर संगीताचे जुजबी शिक्षण घेऊन एक छंद म्हणून निवृत्तीनंतर सुद्धा या भगिनी आपली कला जोपासत आहेत याबद्दल आनंद वाटतो. एक उगवती स्वराज्ञी कु. अनघा भिडे हिने 'मुंबई-पुणे-मुंबई' या सिनेमातील आणि पॉप संगीतासारखी गाणी सादर करून प्रेक्षकांकडून वन्स्‌मोअरची अनेकदा दाद मिळवून षट्‌कारच ठोकले. या कार्यक्रमाचे खुमासदार सूत्रसंचालन सौ. मीनल भिडे यांनी केले.

भिडे प्रतिष्ठानमुळे अनेक व्यक्ती व कुटुंबे आपण जोडीत आहोत. अनेक ज्ञात नसलेले तरूण, वयस्क कलाकारांना आपली कला सादर करण्याची संधी देत आहोत. अशा प्रकारचे विविध गुण अंगी असणाऱ्या भिडे कलाकारांनी प्रतिष्ठानपर्यंत पोचून इच्छा प्रदर्शित केल्यास प्रतिष्ठानचे व्यासपीठ आपल्यासाठी सदैव खुले राहील.

या कार्यक्रमानंतर पुरी, गुलाबजाम, डाळ-तडका, पुलाव, खमंग कोथिंबीर वड्या व काकडी कोशिंबीर यांचा आस्वाद घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली. संमेलन आयोजन व नियोजनाची जबाबदारी म्हणजे कार्यकर्त्यांना आव्हानच असते. तसेच अशा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणे हे सुद्धा कठीणच असते. त्या दृष्टीने अतिशय मेहनत घेऊन ही जबाबदारी सौ. पूर्वा देवधर (भिडे) व सौ. संपदा भिडे या द्वयीने उत्कृष्टपणे पार पाडली ही बाब कौतुकास्पद आहे.

हा कार्यक्रम सादर होत असतांना आमचे ज्येष्ठ मार्गदर्शक व प्रतिष्ठानचे मेरुमणी कै. दामोदरपंत भिडे यांची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवली, त्यांच्या पश्चात मुंबईत प्रथमच झालेला हा उत्तम कार्यक्रम बघण्यासाठी ते नाहीत असे वाटू नये म्हणून व्यासपीठावर त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जणूकाही त्यांच्या समोरच हा कार्यक्रम सादर होतो आहे असा आभास निर्माण केला. असो ! श्री. अजय भालचंद्र, संजय शंकर, विजय अनंत, चिंतामणी, चैतन्य, संपदा व पूर्वाताई इत्यादी हरहुन्नरी व तरूण कार्यकर्त्यांचे नियोजन आणि प्रभाकरपंत, प्रदीपजी, श्रीधरपंत, रमेशराव यांचे मार्गदर्शन अशा मिश्रणामुळे हा कार्यक्रम उत्कृष्ठ व यशस्वी झाला याबद्दल प्रतिष्ठानचेवतीने धन्यवाद ! असेच नवनवीन कार्यकर्ते व कलाकार यांची श्रृंखला वृद्धिंगत करूया ! 'एकमेकां साह्य करू अवघे होऊ संघटित' असे म्हणत प्रत्येकजण आपापल्या घरी निघाला. ■

**मदतीचा हात हवा** 'आम्ही भिडे' अंकाकरिता पुण्यातून मराठी डी.टी.पी. किंवा संपादन विभागामध्ये सक्रीय मदत करू इच्छिणाऱ्यांनी संपर्क करावा. दिलीप भिडे - ९६५७५४१२३६, ले. क. सुनील भिडे - ९६२३०१७४४४, विनायक भिडे - ९५५२२१६९६७



आमचे ध्येय..
परिपूर्ण औद्योगिक सहाय्य !
NORTON
GRINDWELL NORTON LTD.
GRINDING WHEELS
COATED
DIMOND & CBN
NON-WOVEN (BEAR-TEX)
SAINT-GOBAIN
ABRASIVES
TOTEM
FORBS GOKAK LTD.
FORBES RECISION TOOLS
MIRANDA
Fenner
V-BELTS
POLY-F PLUS
THE MATCHLESS PERFORMER
LENOX
Bimetal Bandsaw
TAPARIA
Hand Tools
ADDISON
High Speed Steel
METAL CUTTING TOOS
TI
TRUMAX
MACHINE TOOL ACCESSORIES
PIONEER
WHEELS CASTORS & TROLLEYS
भिडे यंत्र लोह वस्तु केंद्र
मुख्य शाखा
730, गणपती पेठ, सांगली. 416 416 फोन : 0233 - 2373220, 2326478 Email : bylvk@dataone.in
कोल्हापूर शाखा
448/बी, पूना-बेंगलोर हायवे, मु. पो. नागाव, 416 122 फोन : 0231 - 2469448/49

## प्रतिष्ठान तर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांबद्दल निवेदन

भिडे प्रतिष्ठानतर्फे २०१४ मध्ये संपन्न होणाऱ्या भिडे कुल संमेलनात खालील पुरस्कार देण्यात येतील. त्याकरिता दिलेल्या निकषांनुसार आपले नामांकन प्रतिष्ठानच्या खालील पत्त्यावर पाठवावे.

**१) ''श्रीकृष्ण महादेव स्मृति साहस/ क्रीडा पुरस्कार''** –

पुणे येथील कै. श्रीकृष्ण भिडे यांचे स्मरणार्थ श्री. रा. न. भिडे (निगडी, पुणे) पुरस्कृत ''श्रीकृष्ण-महादेव''स्मृति साहस/क्रीडा पुरस्कार असून भिडे कुटुंबातील साहसी वृत्तीच्या किंवा क्रीडा क्षेत्रामध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या व्यक्तीस तो दिला जातो. कै. श्रीकृष्ण भिडे हे कुशल गिर्यारोहक, उत्कृष्ट खो खो आणि कबड्डी पटु होते. पुणे शहर क्रीडा क्षेत्रातील एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आणि तळमळीचे सामाजिक कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख होती.

**२) ''माझी आई'' पुरस्कार**

२०१४ साला पासून नव्याने सुरू होत असलेला हा पुरस्कार कै. सुशीला रावजी भिडे यांचे स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव रविंद्र रावजी भिडे, कल्याण, यांनी पुरस्कृत केला आहे. त्यासाठी गृहिणी, ज्येष्ठ स्त्री (वय ६० वर्षे किंवा त्यापुढील) असावी, तसेच अल्प उत्पन्न आणि प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन मुलांकरिता किंवा स्वत:च्या कुटुंबाकरिता विशेष कार्य करणारी असावी.

**३) 'कला पुरस्कार'**

संगीत, नाटक, सिनेमा किंवा इतर कलेच्या क्षेत्रात चमकदार कामगिरी करणाऱ्या खास भिडे व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो.

सांगली येथील भिडे यंत्र, लोह वस्तू केंद्र आणि व्ही. व्ही. एण्टरप्रायझेस या संस्थांचे आधारस्तंभ असलेले कै. सुभाष विष्णू भिडे यांचे स्मरणार्थ त्यांचे बंधू श्री. कुमार विष्णू आणि श्री. वसंत विष्णू भिडे यांनी हा पुरस्कार ठेवला आहे.

**४) 'आपली सून' पुरस्कार**

घरातील स्त्री मुळेच संस्कारांची ठेव एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत जाते. हा संस्कारांचा वारसा पिढ्यानपिढ्या चालू राहतो. अशा कार्याला कारण ठरलेल्या भिडे कुटुंबातील सुनेचा गौरव व्हावा हा यामागील उद्देश आहे. हा पुरस्कार सांगली येथील सौ. मेधा ऊर्फ अनुराधा अविनाश भिडे यांनी पुरस्कृत केला आहे. त्याचे निकष पुढीलप्रमाणे आहेत -

सुसंस्कारांचा वारसा सतत पुढे नेणारी, समाज कार्यात अग्रेसर असणारी, अध्यात्मिक क्षेत्रात प्रचारकार्य करणारी, प्रतिकूल परिस्थितीत मुलांसाठी किंवा कुटुंबासाठी विशेष कार्य करणारी स्त्री असावी.

**५) उद्योजक पुरस्कार** -

कै. विष्णू विनायक तथा अण्णासाहेब भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव श्री. कुमार विष्णू भिडे, यांनी सदर पुरस्कार जाहीर केलेला आहे.

वरील सर्व पुरस्कारार्थीना प्रशस्तिपत्र, शाल, श्रीफळ व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात येईल.

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान** -
C/o **विनायक वि. भिडे**
**५५३, नारायण पेठ, माती गणपती जवळ,**
**भिडे वाडा, पुणे ४११०३०.**

## आवाहन

सौ. स्वप्ना सुनील भिडे, पुणे या कुलभगिनी कर्करोगाने आजारी आहेत. त्यांनी औषधोपचाराकरिता नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानकडे मदतीचा हात मागितला आहे. अंदाजे खर्च रु. ३,५०,०००/- इतका आहे. भिडे प्रतिष्ठानने वैद्यकीय मदत निधी मधून रु. १०,०००/- त्यांना तातडीने देऊ केले आहेत. ज्या कुलबंधू/ भगिनी/ माहेरवाशिणींना मदत द्यायची असेल त्यांनी ती भिडे प्रतिष्ठानच्या वैद्यकीय मदत निधीस द्यावी ही विनंती !

आपले धनादेश **'नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान'** या नावानेच द्यावेत/पाठवावेत.

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान**
द्वारा - विनायक वि. भिडे
५५३, नारायण पेठ, भिडे वाडा, माती गणपती समोर, पुणे - ४११ ०३०.
मो. ९५५२२१६९६७ आणि ले. क. सुनील भिडे - ९६२३०१७४४४,
श्री. चिंतामणी भिडे (ठाणे) - ९८२११६०६७५
याशिवाय **ऑन लाइन मदत स्वीकारण्याकरिता** -
**ठाणे जनता सहकारी बँक, सदाशिव पेठ शाखा, पुणे ३०.**
**खाते क्रमांक : १२९४,** **RTGS Code - TJSB - 0000018.**
आपण या खात्यात परस्परही रक्कम भरू शकता मात्र पैसे भरल्याची काउंटर फॉईल प्रतिष्ठानकडे आठवणीने पाठवावी म्हणजे पासबुकमध्ये होणारी नोंद तपासून बघता येईल.

## श्रद्धांजली

भिडे कुलातील खालील व्यक्तींना देवाज्ञा झाली, ईश्वर त्यांचे मृतात्म्यास सद्गती देवो ही प्रार्थना !

१) कै. वसंत महादेव भिडे, ठाणे
२) कै. पांडुरंग ऊर्फ दादा रघुनाथ भिडे

## सांत्वना

श्री. पांडुरंग ऊर्फ दादा रघुनाथ भिडे, यांचे दि. ७ एप्रिल १३ रोजी मुंबईत दु:खद निधन झाले. त्यांचा जन्म १९३२ साली कोकणातील देवगड तालुक्यातील मोंड या गावी झाला. १९३४ साली त्यांच्या वडिलांनी टेंबवली गावात स्थलांतर केले. दादांनी गरिबीमुळे शिक्षण अर्धवट सोडून १९४८ साली मुंबईमध्ये आले. अनेक छोटे-मोठे उद्योग करत १९५० साली एका टेक्सटाईल मिलमध्ये हेल्पर म्हणून कामास लागले. टेक्स्टाईल मशिन्सची संपूर्ण माहिती झाल्यावर १९७० साली मुंबई (भांडुप) मध्ये स्वत:चा टेक्स्टाईल मशिनरी बनविण्याचा कारखाना सुरू केला. त्यानंतर १९९० मध्ये डोंबिवली येथे गुरुदेव प्रोसेसर्स या नावाने स्वत:चे टेक्स्टाईल प्रोसेस हाऊस सुरू केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ते स्वयंसेवक होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढून त्यांनी शून्यातून विश्व निर्माण केले. प्रतिष्ठानचे आधारवड स्व. दामूकाका भिडे यांचे ते चुलत बंधू होत. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी आणि हेमंत व उदय ही दोन मुले व डॉ. कल्पना मोघे ही कन्या आहे.

आम्ही प्रतिष्ठानचे सर्व सभासद त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी आहोत. परमेश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना !


# BHIDE & SONS PVT. LTD.

**AN ISO 9001 : 2000 COMPANY**

**Head Office :** Timber Area, Shivajinagar [N], Sangli-416 416 Mah. [INDIA] **Tel. :** +91-233-2375011 **Fax :** +91-233-2376804
**Pune Unit :** T-145, M.I.D.C Bhosari, Pune-26. **Cell. :** 9225 8181 25 **E-mail :** bhidesons@yahoo.co.in


## AGRICULTURE & GARDEN WASTE RECYCLING MACHINES

### CHIPPER SHREDDER CS-33



Power Require : **5 to 10 H.P.**
Output Capacity : **500 Kg / hr.**
Engine Driven Model also available

### CHIPPER SHREDDER CS-50




Power Require : **15 to 20 H.P.**
Output Capacity : **1 Tonn / hr.**
Motor Driven & Engine Driven Model also available

### CHIPPER C-80



Power Require : **25 to 30 H.P.**
Output Capacity : **3 Tonn / hr.**
Motor Driven Model also available

### CHAFF CUTTER



Power Require : **2 H.P./ 3 H.P. / 5 H.P.**
Output Capacity : **200 Kg / hr., 400 Kg / hr., 800 Kg / hr.**
Motor driven & Engine Driven Model also available

## INDUSTRIAL PRODUCTS

### PISTON VALVES
**(FOR STEAM-LINE)**



**IBR & Non IBR Piston Valve**
**Class 150, Class 300 & PN 40**
**Size 15 mm to 150 mm**

### HIGH PRESSURE RECIPROCATING PUMPS (POWER PUMP)



**Pressure - From 30 kg/cm$^2$ to 300 kg/cm$^2$**
**Application - Chemical Injection, Cleaning Drainage Pipes, Boiler feed etc.**

### CASTINGS




**Heavy C.I. Castings**
**Maximum single piece - 2 Tonn**

### S.G.IRON FOR AUTO COMPONENTS



**Castings :**
**Steel, Stainless Steel & S.G. Iron**
**Range - From 1 kg. To 100 kg.**

### LADDLE



**Foundry Crane Laddles**
**Capacity : Upto 20 Ton**

# ऐसा म्या देखिला निराकारु . . . !

अरविंद भिडे, कल्याण
मो. ९८२०८१६३७४

माणसाला देवाबद्दल फारच अप्रूप आणि भक्ती असते. संत श्री. तुकारामांपासून सर्व संतांनी प्रत्यक्षात देव भेटावा अशी मनोमन इच्छा आणि प्रार्थना केली. परंतु ''देव'' अशी जी आपण कल्पना करतो, तो देव प्रत्यक्ष आपल्या ईश्वरी रूपात कोणालातरी दिसला असेल का ? तर त्याचे उत्तर जास्ती करून नाही हेच म्हणावे लागेल. प्रभू रामचंद्र, कृष्ण हे पुराणकालीन अवतारी पुरुष होते. त्याच प्रमाणे आधुनिक काळातील श्री. साईबाबा, श्री. स्वामी समर्थ हे अवतारी पुरुषच म्हणावे लागतील. परंतु देव ही कल्पना ''निर्गुण निराकारी'' असल्याने तो दिसणे शक्य नाही. परंतु शारिरीक अवस्थेत तो कोणाला दिसत नाही. तो जाणावा लागतो. जीवनामध्ये जेंव्हा काही गोष्टी, काही प्रसंग हे सहसा न होणाऱ्या प्रकारात येतात आणि त्यामुळे एखाद्या व्यक्तीचा जीव वाचतो किंवा इतर असे लाभ होतात की ज्याची आठवण आयुष्यभर राहावी, सर्वांना सांगावी. त्या प्रसंगात मदतीस आलेल्या व्यक्तीच्या स्वरूपात ''प्रत्यक्ष देवच'' आला असे म्हणावे लागते. निर्गुण निराकार असणारा देव त्या व्यक्तीमध्ये संचारून आपल्याला भेटतो. मात्र हे श्रद्धापूर्वक जाणावे लागते.

**असे काही प्रसंग**

१९६९ साल, मी दरमहाच्या संकष्टी चतुर्थीला कल्याणहून थेऊरला जात असे. माझ्या दुचाकीवरून मागे कोणालातरी घेऊन मी पहाटे घरून कल्याणहून निघून थेऊरला जात असे आणि दर्शन प्रसाद वगैरे करून परत येत असे. अशाच एका चतुर्थीला रात्रीच्यावेळी परत येताना कामशेत जवळील रस्त्यावर आम्ही आलेलो असताना समोरून एका टँकरने गाडीला जोरदार धडक दिली आणि वेगाने तो निघूनही गेला. दुचाकी पूर्णपणे मोडली, काय करावे सुचेना. त्याचवेळी पुण्याकडून येणारा एक ओपन ट्रक थांबला ड्रायव्हर खाली उतरला माझी स्थिती पाहून त्याने माझी गाडी ट्रकमध्ये घेतली. माझ्याबरोबरीचा मित्र कामशेत स्टेशनवर निघूनही गेला. ड्रायव्हरने मला घेतले आणि मी त्याच्याशी बोलणे सुरू केले. तो कोण कुठला याची चौकशी सुरू केली. तो म्हणाला या गाडीचे मालक आमचे शेट श्री. ए. सी. शहा आहेत आणि ते गव्हर्नमेंट प्लंबर आहेत. प्लम्बींगचे पाईप घेऊन आम्ही पुण्याला गेलो होतो. आता ठाणे M.I.D.C. मध्ये परत जात आहोत. तिथे आमचे गोडाऊन आहे. मला त्याही परिस्थितीत सुखद आश्चर्याचा धक्का बसला कारण त्या ट्रकचे मालक श्री. शहा हे माझे Client होते आणि त्यांचे कल्याण येथील काम मी करीत होतो. मी बोलता बोलता तुमचे शेट माझे Client आहेत असे सांगितले. तो म्हणाला मी तुम्हाला आमच्या गोडाऊन पर्यंत सोडतो. चतुर्थीचा उपवास होता. दुचाकी असती तर मी पनवेलला बहिणीकडे जाऊन उपास सोडणार होतो. अडीच ते तीन तासांनी गाडी ठाणे M.I.D.C. ला पाहोचली. ड्रायव्हरने गाडी गोडावूनमध्ये उतरवून घेतली आणि मला म्हणाला पैसे आहेत का ? पैशांचे काय ? मी संकोच करू लागलो. तेव्हा त्याने १५-२० रुपये माझ्याकडे देवून येथून मुलुंड स्टेशन जवळ आहे असे सांगितले. आणि जपून जा असेही सांगितले. वेळ रात्रीची १२ नंतरची होती. मी स्टेशनला आलो, कल्याणला घरी आलो आणि सर्वप्रथम देवाला नमस्कार केला. माझा विवाह झाला नव्हता आणि वृद्ध आईच फक्त घरात होती. देवाला नमस्कार करताना माझ्या मनात आले आज आपल्याला भेटलेला ड्रायव्हर हा साक्षात परमेश्वरच म्हणायला हवा. सर्वसामान्यपणे रस्त्यावरील अपघातात किंवा घरामध्येही पाय घसरून पडणाऱ्यांची हाडे मोडतात, डोक्याला जबरदस्त जखम होते परंतु मला काहीही झाले नाही. यातून मला प्रत्यक्ष गजाननाचे दर्शन झाले. संकष्टीचा उपवास फळाला आला.

लग्नानंतर आम्ही स्वतः Tour Program ठरवून प्रवासाला जात असू, पुढील प्रसंग जरी किरकोळ असला तरी आजच्या भ्रष्टाचारी युगात लक्षात येण्यासारखा आहे. प्रवासामध्ये आमची बॅग वगैरे सर्व चोरीला गेले. तरीही सहकारी मित्रांबरोबर आमचा प्रवास चालूच राहिला. येतांना अलाहाबादहून कल्याणला यायचे होते. रिझर्वेशन त्यावेळेप्रमाणे हाती लिहून झालेले होते. गाडीचे आदल्या दिवशी आम्ही रिझर्वेशन स्लीप घेऊन स्टेशनवर गेलो तेव्हा रॉंग नंबर रिझर्वेशन झाल्याचे समजले. ती गाडी दुसऱ्या दिवशी नव्हतीच. तरीही स्टेशन मास्तरांनी लिहिलेल्या गाडीत बसा आणि हेच तिकीट दाखवा, असे सांगितले. धास्तावलेले आम्ही दुसऱ्या दिवशी मुंबईला येणाऱ्या गाडीत दोन लहान मुलांसह कसेतरी चढलो. २४ तासांचा प्रवास. साधी जागाही नव्हती. २/४ स्टेशन्स् गेल्यावर टी. सी. आला. त्याने आमची तिकिटे पाहिली आणि ती या गाडीची नाहीत असे सांगितले. आम्ही बुकिंग क्लार्कची चूक सांगितली. त्याने ठीक आहे असे म्हणून मी प्रयत्न करतो असे सांगून बर्थ रिझर्वेशनसाठी पावती देण्यासाठी बॅग काढली त्यावर आतील भागावर श्री. गजानन महाराजांचे चित्र होते. त्यांनी कसेतरी दोन बर्थ मिळतील संध्याकाळपर्यंत असे सांगितले. पावती तयार केली. मी साहजिकच प्रथेप्रमाणे त्याला ''वरची रक्कम'' विचारली. त्याने काही नाही असे सांगून बर्थ रिझर्वेशन स्लीप हातात ठेवली. ''हल्लीचे रिवाज'' लक्षात घेता आम्हांस अडचणीतही मिळालेली तिकिटे आणि त्याने त्यावर काहीही न घेणे ही माझे मते केवळ श्री. गजानन महाराजांचीच कृपा होती. मला टी.सी चे रूपाने प्रत्यक्ष गजानन महाराजच भेटले असे वाटले. नाहीतर आमचे मुलांचे हाल कठीण होते. आमचा प्रवास कमी त्रासाचा झाला. बरोबरीच्या बायका मुलांना झोपायला जागा मिळाल्या.

२००१ - माझ्या मुलाचे, मंदारचे लग्न १९ मे ला ठरले. सर्व प्राथमिक तयारी झालेली. ११ मे रोजी आमचेकडे लग्नाचे व्हीडिओ शुटिंगसाठी ''महेश भावे'' नावाचा तरूण आला होता. वेळ दुपारी जेवणानंतरची, घरात पाहुणे, दुपारी ४ वाजता मला छातीत भरून आले. घाम फुटला, मी अस्वस्थ झालो. महेशने ते पाहिले. घरचे लोक घाबरले. महेशने पाठीवर बुक्के मारून मला जरा स्वस्थ केले. पण डॉक्टरना बोलवा असेही सुचविले. सौ. ने डॉक्टर सेनना फोन केला. ते लगेच आले. बी. पी. पाहिले आणि मला लगेच डॉ. तेलंगणेकडे दाखल करा असे सांगितले. सौ. सुधा, मंदार घाबरले. लग्न १९ तारखेला, आजची तारीख ११, डॉ. तेलंगणेकडे ॲडमिट झाल्यावर त्यांनी रक्तदाब वाढल्याचे सांगून बेडरेस्ट सांगितली. नंतरचे तपासणीत हार्ट ट्रबल सांगून त्वरित मुंबईला हलविणेस सांगून काळजी करू नका. लग्न मुहूर्त तसाच ठेवा ठीक होईल असाही धीर दिला. मी मुंबईला हॉस्पिटलला दाखल झालो. सर्वत्र धावपळ झाली. ईशकृपेने सर्व सावरून मी मात्र on bed राहिलो. १९ तारखेला मोबाईलवर मला ''शुभमंगल सावधान'' ऐकवले. त्यावेळी माझे बरोबर ऑफिसचे निष्ठावंत सेवक श्री. रमेश मराठे, माझे जिवश्च मित्र श्री. विद्याधर देशपांडे होते. मी ही स्वस्थ होतो. ह्या अशा प्रसंगी माझे कल्याणचे मित्रांनी, कार्यकर्त्यांनी संध्याकाळचे Reception सह विवाह समारंभ संपन्न केला. माझी उणीव भासू दिली नाही. जर ईश्वरी कृपा नसती तर हे सारे ११ तारखेसच संपले असते. पण केवळ त्यावेळी (११ तारीख) महेश होता म्हणून दुःखद घटना टळली. नंतर योग्य उपचारांनी मी बराही झालो. By Pass Surgery ही झाली. आणि आज मी ठणठणीत आहे. पण त्या दिवशी महेशच्या रूपाने मला निर्गुण निराकार ईश्वरच दिसला, हे मी कधीच विसरणार नाही.

मित्रहो ईश्वर जरी मानवाकृती स्वरूपात, आपल्या कल्पनेप्रमाणे दिसला नाही तरी विविध रूपाने तो दिसतो. फक्त श्रद्धेने तो जाणावा लागतो. असा निर्गुण निराकार ईश्वर मला ड्रायव्हरचे रूपात, टी. सी. चे रूपात आणि महेशचे रूपात दिसला आणि आजही अनेक प्रसंगी दिसतच आहे.

■

# BHIDE ASSOCIATES

**Synthesis of Finance Technology and Management**



Shri Madhavrao Bhide

Technical & Industrial Consultants, Valuers & Experts for rehabilitation / Revival of Sick Industries for banks & F.I.s experts in T.E.V. studies

**Highly motivated & successful Chief Associates of Bhide Associates in India**




**A C Bhide**
Pune



**P J Bhide**
Kolkata



**M M Gadre**
Chennai



**Suhas Jogdand**
Vodadara



**Dr. R Z Chandak**
Amravati



**Arun Shendurnikar**
Hyderabad



**Sushil Sanghi**
Nagpur



**Prashant Raut**
Mahim H.O.



**Nitin Date**
Nashik



**Rajeshree Hajare**
Raigad Region

Corporate valuers of all types of assets including flats, land, building, machinery, experts in techno economics viability studies and lenders engineers for all types of projects in India and abroad. Consultants to 24 Nationalised, 5 Private Banks, 10 Co-op. Banks & 5 FIs

**BHIDE ASSOCIATES** Well Established For 21 Years
**Synthesis of Finance, Technology and Management**

**Head Office - Mahim, Branch Offices - Flora Fountain, Bandra and Virar**

**Total 16 Regional Offices in India** - Amravati, Ahmedabad, Aurangabad, Belgaum, Bangalore, Chennai, Delhi, Goa, Hyderabad, Indore, Kolkata, Mumbai, Nagpur, Nashik, Pune, Pen, Sangli-Kolhapur, Vadodara

# कल्याण - एक ऐतिहासिक शहर

प्रभाकर शंकर भिडे, ठाणे
९८९२५६३१५४

इ. स. १७३९ साली चिमाजीअप्पांची वसईची मोहीम फत्ते झाली. त्यापूर्वी तेथे पोर्तुगीज अंमल होता. वसईच्या लढाईमुळे भिवंडी ते नागोठणे हा किनारी पट्टा पेशव्यांच्या राजज्यात सामील झाला. त्यामध्ये कल्याण सारखे घाटमाथा व कोंकण यांना जोडणारे कल्याण हे उत्तम बंदर होते. बंदरात मोठ्या मोठ्यामचव्यातून माल भरून येत असे. (पूर्वी वाहतुकीसाठी रस्ते नसल्यामुळे जलमार्गानेच मालाची ने आण होई.)

साहजिकच कल्याणच्या भरभराटीला सुरुवात झाली. आस्ते आस्ते हिंदू लोकांची वस्ती वाढू लागली. त्यांचे प्राबल्य वाढू लागले. (पूर्वी पोर्तुगिजांमुळे ख्रिश्चन व मोगली अमलामध्ये मुस्लिम  लोकांची वस्ती कल्याणला होती.) पण वसई जिंकल्यामुळे मराठ्यांचा दरारा वाढू लागला. त्यात आणखी वैशिष्ट्य म्हणजे खुद्द पेशव्यांचे सासर कल्याणला होते. ते सावकार होते. तसेच त्यांच्याकडे सुभेदारी होती. असे सांगतात की कल्याणात बाजीरावाच्या विवाहाच्यावेळी पारनाका भागात एक मोठा वाडा बांधला होता. तसेच गावाच्या सुरक्षेसाठी खाडीकाठचा दुर्गाडी किल्ल्याला शाहू महाराजांच्या एक कोट बांधला होता. तसेच गावाच्या मध्यावर पोखरणी समोर एक भुईकोट किल्लेवजा वाडा बांधला होता. त्याचा उपयोग युद्ध प्रसंगी सैन्य व्यवस्था व अन्य भांडारासाठी होत असावा. त्यास सरकारी वाडा म्हटले जात असे. त्याच काळात बांधलेले त्रिविक्रम मंदीर आजही आहे. त्यात त्रिविक्रमाची सुबक काळ्या पाषाणातील मूर्ती आहे. दुर्दैवाने पुढे पेशव्यांचे आणि नौदलाचे प्रमुख तुळाजी आंग्रे यांच्यात वितुष्ट आले. ते पेशव्यांना पाण्यात पहात. नाइलाजाने इंग्रजांची मदत घेऊन त्यांचा बंदोबस्त करावा लागला. या कामात आंग्रे यांचे सरदार रामजी महादेव बिवलकर यांनी पेशव्यांना मदत केली. पेशव्यांनी तुळाजीला पुण्यात कैदेत ठेवले. पुढे त्यांची (तुळाजी आंग्रे नंतर) कल्याणच्या सुभ्यावर नेमणूक केली. तसेच सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग व आरमार यांच्यावर आनंदराव धुळप यांची नेमणूक केली.

रामजी महादेव हे कर्तृत्ववान व द्रष्टे होते. त्यांची नेमणूक झाल्यावर ते पेशव्यांच्या तर्फे आपल्या सुभ्यात कर, जकात वसुली, संरक्षण व सागरी कारवाया करताना दिसतात.

रामजी महादेव हे मूळचे श्रीवर्धनचे राहणारे होते. पुढे ते आंग्रे यांच्या बरोबर अलिबागला राहत असत. त्यांनी आपला मुक्काम नंतर ठाणे येथे हलवला. तेथे वाडा बांधला तसेच ठाणे किल्ल्याची दुरुस्ती केली. ठाण्याचे प्रसिद्ध कौपिनेश्वराचे मंदीर १७६० साली बांधले. ठाण्याप्रमाणे कल्याणलाही व्यवस्थेसाठी एक वाडा बांधला. हाच तो कल्याणचा प्रसिद्ध सुभेदार वाडा (सध्या तेथे शाळा भरते). तो दोन मजली व दोन चौकी चौसोपी वाडा १७६९ साली बांधला. या वाड्यात ते दरबार भरवीत. वाड्याच्या दिंडीवरील नऊ खणी दिवाणखाना शनिवार वाड्यातील गणेश महालासारखा होता. हा वाडा कचेरी असावी अशी त्याची रचना होती. त्यांनी कल्याणात अनेक सुधारणा केल्या. पाण्यासाठी एक मोठी पुष्करणी बांधली. गावाच्या तटबंदीची सुधारणा केली. त्यांच्याच काळात कल्याणमध्ये पिंपुटकर, लेले, केतकर, कार्लेकर, गोळे ही मंडळी राहण्यास आली. तसेच सरदार मेहेंदळे, विसाजीपंत लेले, फडके यांची येथे घरे होती. वाड्यासमोर हजार घोडेस्वार उभे राहतील असे मैदान होते. रामजी महादेव स्वत: शंकर भक्त होते त्यांनी आपल्या सुभ्यात १०८ शंकराची मंदिरे बांधली. त्या काळात कल्याण गांव म्हणून पुन्हा एकदा भरभराटीला आले. कल्याणला पूर्वी तांब्याची टांकसाळ होती. ईस्ट इंडिया कंपनीने या टांकसाळी मधून नाणी पाडून घेतल्याचे पुरावे मिळतात. रामजी महादेव मुंबईला पेशव्यांचे प्रतिनिधी म्हणून इंग्रजांशी बोलणी करण्यास जात असत.

अशी कल्याणला ऐतिहासिक पार्श्वभूमी असून आता नवीन तऱ्हेने कल्याण भरभराटीला येत आहे. कल्याण-डोंबिवली महापालिकेचे मुख्य कार्यालय कल्याण येथे आहे. स्वतंत्र नाट्यगृह आहे. तसेच मुंबईहून उत्तर व दक्षिण भारतात जाण्यासाठी मुंबई नंतरचे मोठे जंक्शन कल्याणच आहे. कल्याण मच्छिमारी बंदर असल्यामुळे कोळी समाजाची मोठी वस्ती आहे. तसेच जवळच दुर्गाडी व मलंगगड असे टेहळणीसाठी भुईकोट किल्ले आहेत.

■

# भिडे भगिनींचे (कल्याण-डोंबिवली) चैत्री हळदीकुंकू

ॲड. अलका भिडे
डोंबिवली

पूर्वी भारतीय परंपरेचा व संस्कृतीचा भाग म्हणून दरवर्षी चैत्रगौरी हळदीकुंकू हा कार्यक्रम घरोघरी साजरा होत असे. त्या निमित्ताने स्त्रिया एकमेकींना भेटत. चैत्र महिन्यात आंब्याचा मौसम असल्यामुळे आंब्याची डाळ व पन्हे दिले जाई. आपल्या सणांचे वैशिष्ट्य म्हणजे ते निसर्गाशी जोडलेले आहेत. निसर्गात जे उपलब्ध असे ते चवीने एकत्र दिले जाई. (यामध्ये सामाजिक मानसिकता, समानता दिसून येते.) नवीन कालामध्ये स्त्रिया नोकरी किंवा व्यवसायासाठी घराबाहेर पडू लागल्या. साहजिकच वेळेच्या अभावी पूर्वीचे संस्कार, सण यांचे महत्त्व कमी झाले. पण नवीन स्वरुपात (प्रत्येक घरी न करता) सर्व स्त्रियांनी एकत्र येऊन चैत्रगौरीचे हळदीकुंकू साजरे केले तर नवीन पिढीला हळदी कुंकवाचे महत्त्व कळेल या भावनेतून कल्याण-डोंबिवली येथील सर्व भिडे भगिनींनी एकत्र येऊन हळदीकुंकू केले. त्या निमित्त सर्व भगिनी एकत्र आल्या.



महिला उत्कर्ष हॉल कल्याण येथे चैत्र गौरीचा हळदीकुंकवाचा कार्यक्रम दि. १३ एप्रिल २०१३ रोजी संध्याकाळी आयोजित केला होता. समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून नि. गो. भिडे प्रतिष्ठानचे सचिव श्री. प्रभाकर भिडे उपस्थित होते.

गणेशवंदन व गौरी पूजनानंतर दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रमुख पाहुण्यांची ओळख श्री. प्रदीप भिडे यांनी करून दिली. श्री. प्रभाकर भिडे यांनी या कार्यक्रमाचा उद्देश सर्व भिडे कुटुंबीयांनी एकत्र येऊन, एकत्र येण्यामागचे महत्त्व व गरज यावर उत्तम मार्गदर्शन केले. त्यानंतर या कार्यक्रमाची मूळ संकल्पना मांडणाऱ्या कुमुद भिडे यांनी त्यांचे विचार थोडक्यात मांडले. श्री. अरविंद भिडे यांनी त्यांच्या आजपर्यंत झालेल्या व स्वत: हजर राहिलेल्या कुलसंमेलनांची थोडक्यात माहिती व अनुभव सर्वांसमोर कथन केले. या कार्यक्रमाचा उद्देश सर्व भिडे महिलांची एकमेकींशी ओळख व्हावी हा असल्याने सर्व महिलांनी स्टेजवर येऊन आपली ओळख करून दिली. डाळ व पन्हे याच्या आस्वादासह चैत्राच्या आल्हाददायक व नववर्षाच्या उत्साहाच्या वातवरणात आभारप्रदर्शन व नंतर पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. सर्व भिडे महिलांनी प्रचंड संख्येने आवर्जून उपस्थित राहून **'आम्ही भिडे'** या संकल्पनेची सत्यता पटवून दिली व कार्यक्रम यशस्वी केला. या कार्यक्रमासाठी कल्याणच्या ॲड. अलका भिडे, कुमुद भिडे व अन्य भिडे भगिनींनी बरीच मेहनत घेतली.

■

## ''मास्तरीण रिटायर्ड झाली''

मास्तरीण रिटायर्ड झाली, शाळेतली छडी घरांत आली ।।
मी व्हिआरअेस, घेऊन मजेत होतो. वाटेल तेवढा झोपत होतो
वाटेल तेव्हा उठत होतो, पेपर वाचत लोळत होतो ।
आंघोळीची घाई नव्हती, चहा पिण्याला मर्यादा नव्हती,
कारण बाई घरात नव्हती ।।१।।
आता बाई रिटायर्ड झाली - शाळेतली छडी घरात आली ।
आता सारंच बदलूनच गेलं, सगळंच सुख संपून गेलं ।
दुर्दैव माझं सुरू झालं, छडीचं राज्य सुरू झालं ।
छडीचं छम् छम् चालू झालं ।।२।।
अहो लोळत किती वेळ पडता, पेपर सारखा वाचत बसता,
फोन वर काय बोलत बसता, आळशीपणाचा घेतलाय मक्ता ।।३।।
लौकर उठा, अंघोळ उरका, कपडे धुवायला देवून टाका,
चहा किती वेळा मागत बसता वेळ माझा किती मोडता,
आता तुमचं असं चालायचं नाही, चहा मुळीच मिळणार नाही,
नसते लाड चालणार नाहीत ।।४।।
नऊचे आत सगळं उरका, लवकर लौकर न्याहारी आटपा,
पिशवी घेऊन बाहेर सटका,
भाजी चांगली पारखून आणा येताना किराणा वाण निरखून आणा
कटकट नसती चालू झाली, शाळेतली छडी घरांत आली ।।५।।
त्यांत आणखी आफत आली मोबाईल नावाची क्रांती झाली,
हिच्या हाती लगाम आली, माझ्या नाकात वेसण आली ।।६।।
अहो बाहेर पूर्वीसारखं भटकणं नाही, गप्पाष्टक जमवून बसणं नाही,
नेत्र सुख घेत फिरणं नाही, हॉटेलात जावून चरणं नाही,
अहो कुठं आहात, काय करताय, घरी लौकर परतायचं का नाही,
भाजी किराणा आणायचाय विसरू नका - सबबी मला सांगू नका,
नाहीतर आज जेवणाला अंगठा ।।७।।
मोबाईलचं कोकलणं चालू झालं, सारं सुख लयाला गेलं,
अशी माझी गोची झाली, वेसण तिच्या हाती आली,
शाळेतली छडी घरात आली ।।८।।
सल्ला माझा ऐका, व्ही आर एस् मुळीच घेऊ नका,
रिटायर्ड झाल्याचं सांगूच नका,
बाइल माझी रिटायर्ड झाली, शाळेतली छडी घरात आली ।।९।।
अहो बरका, हे सर्व माझं नाही, शेजाऱ्यांचं काही बाही,
माझी ''ही'' तसली नाही.
ही नुसतीच शा. मा., प्रकाश देते जशी ''शमा''
छडीच्या धाकानं सांगत नाही माझी ही खरंच तशी नाही ।।१०।।

**श्री. प्रभाकर वासुदेव भिडे (डोंबिवली)**
**९९६७१८४८१७**

## मनोगत

श्री. प्रदीप वा. भिडे आणि डॉ. सौ. शीला भिडे या दाम्पत्याने नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या शिक्षण निधी करिता गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या परंतु आर्थिक परिस्थिती कमकुवत असणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिक्षण आर्थिक अडचणीमुळे थांबता कामा नये हा उदात्त व विशाल विचार करून भिडे प्रतिष्ठानकडे शिक्षणनिधी करिता ५ लाख रुपये सुपूर्द करून प्रतिष्ठानवर दाखविलेला विश्वास म्हणजे प्रतिष्ठानच्या चांगल्या कामाची पावतीच म्हणावी लागेल. श्री. प्रदीपजी व डॉ. शीलाताईंनी सुचविलेल्या नॉर्म्स प्रमाणे त्याची कार्यवाही होईल याची ग्वाही आम्ही प्रतिष्ठानच्या वतीने देत आहोत. या दाम्पत्याचे भिडे प्रतिष्ठान ऋणी राहील.

२०१० जानेवारी मध्ये मुंडाजे (कर्नाटक) येथे संपन्न झालेल्या भिडे कुलसंमेलनाचे अध्यक्षपद या दाम्पत्याने भूषविले होते.

श्री. प्रदीप व डॉ. शीला भिडे हे उभयता सनदी अधिकारी म्हणून निवृत्त झाले. श्री. प्रदीपजी भारत सरकारच्या अर्थ खात्यात महसूल सचिव, गृह मंत्रालयात विशेष सचिव आणि इंदिरा व राजीव गांधी यांचे सरकार असताना अर्थ खात्यात संचालक अशा मानाच्या पदावर होते. त्याचप्रमाणे डॉ. शीलाताईंनी परराष्ट्र मंत्रालयात आर्थिक सल्लागार, विशेष सचिव, संरक्षण मंत्रालयात अतिरिक्त सचिव तसेच वित्त, उद्योग व वाणिज्य या खात्यातसुद्धा त्यांनी वरील पदे भूषविली आहेत. २००८ मध्ये त्यांना पंतप्रधानांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते. श्री. प्रदीपजींचे वडीलसुद्धा सनदी अधिकारी आणि बँक ऑफ महाराष्ट्रचे कस्टोडियन म्हणून कार्यरत होते. अशा घराला सरस्वतीचा वरदहस्त आहे. शिक्षणाने ज्ञान मिळते, ज्ञानाने अर्थार्जन होते. म्हणून त्यांची शिक्षणाशी खूप जवळीक आहे. आपल्या मातापित्यांनी शिक्षणासाठी प्रोत्साहन दिल्यामुळे आज ते शिक्षणाच्या बळावर उभे राहिले. याची जाणीव ठेवून ते भिडे प्रतिष्ठानच्या माध्यमातून गरीब, गुणवान अशा होतकरू विद्यार्थिनींना मदत करत आहेत. ही बाब प्रशंसनीय आहे. आम्हास असा विश्वास आहे की विद्यार्थिनींना मिळालेल्या मदतीतून भिड्यांची भावी पिढी त्यांच्या या विचारांचे सार्थक करतील यात शंकाच नाही.

२००९ चे अगोदर भिडे प्रतिष्ठान त्यांच्या संपर्कात होते परंतु या उभयतांच्या कामाच्या व्यस्ततेमुळे त्यांची भेट होऊ शकली नाही, परंतु योगायोगाने २००९ मध्ये एक दिवस पुण्यात त्यांची भेट झाली, गप्पाही झाल्या. भिडे प्रतिष्ठानच्या कार्याबद्दल त्यांनी आस्थेने विचारपूस केली. दोघेही नुकतेच निवृत्त झालेले असल्याने २०१० मध्ये अभूतपूर्व मुंडाजे (कर्नाटक) येथे झालेल्या भिडे कुलसंमेलनाचे अध्यक्षपद उभयतांनी घ्यावे असा अगत्याचा आग्रह असल्यामुळे त्यांनी ते स्वीकारले आणि भिडे प्रतिष्ठानचे कार्य आणि नियोजन पाहून प्रशंसा केली. तरुण गुणवान भिडे कुलोत्पन्नांनी सनदी सेवेत यायला हवे, देशभरात कुठेही जाऊन देशाची सेवा करायला हवी ही काळाची गरज आहे असा राष्ट्रीय दृष्टिकोन ठेवायला हवा अशी त्यांची मनोकामना आपल्या भावी पिढीकरिता वरदान ठरेल हे नक्कीच !

**श्री. शशिकुमार आणि चंद्रकांत भिडे**
**कार्याध्यक्ष (नि. गो. भिडे प्रतिष्ठान)**

### नम्र सूचना


१) ज्या कुलबंधू/भगिनींना/माहेरवाशिणींना 'आम्ही भिडे'चा अंक मिळत नाही अथवा प्रतिष्ठानकडून कोणताही पत्रव्यवहार होत नाही त्यांनी खालील क्रमांकावर त्वरित संपर्क साधून आपला पत्ता व फोन नंबर द्यावा. २) ज्या कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणींना 'आम्ही भिडे' चा तोच अंक दोनदा मिळत असेल त्यांनी त्वरित कळवावे. ३) आपल्याला वेळेवर अंक मिळण्यासाठी आपला अचूक पत्ता प्रतिष्ठानकडे पाठवावा. **संपर्कासाठी - दिलीप भिडे (पुणे)** ९६५७५४१२३६, **ले. क. (नि.) सुनील भिडे (पुणे)** ९६२३०१७४४४, **अजय भिडे, (मुंबई)** ९१९९६९५४४७२४, **विजय भिडे, (ठाणे)** ९१९८३३०४५४६३

# अभिनंदन !



**१) कु. देविका भिडे** हिचे नांव व तिचा टेबलटेनिस क्षेत्रातला दबदबा **'आम्ही भिडे'** वाचकांना सुपरिचित आहेच. तिच्या शिरपेचात आणखी मानाचे तुरे लागलेत ते असे -

- इंदूर येथील राष्ट्रीय स्पर्धेत विजेते पद,
- रायपूर येथील स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व,
- शारदा स्पोर्टस् सेंटर पुणे येथील स्पर्धेत तिहेरी मुकुट त्यात अठरा वर्षा खालील मुली, १९ वर्षाखालील मुली तसेच महिलांचा खुला गट अशा तिन्ही गटांचे विजेतेपद,
- नांदेड येथे महाराष्ट्र राज्य मानांकन स्पर्धेचे विजेतेपद. नि. गो. भिडे प्रतिष्ठान तर्फे देविकाचे कौतुक व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा !



S>m°. g§Vmof

२) पुणे नेत्ररोग संघटनेच्या अध्यक्षपदी **डॉ. संतोष भिडे** यांची निवड करण्यात आली आहे. प्रतिष्ठानचे वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन !

**३) श्री. रविंद्र प्रभाकर भिडे,** पुणे यांची दी रोझ सोसायटी ऑफ पुणे च्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती पुढील दीड वर्षासाठी असेल. भिडे प्रतिष्ठान आणि समस्त भिडे कुटुंबियांतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन !



lr. aqdÐ

श्री. रविंद्र हे गेली २९ वर्षे गुलाब क्षेत्रात काम करत असून त्यांनी गुलाबावर अनेक व्याख्याने दिली आहेत, अनेक लेख लिहिले आहेत. वेगवेगळ्या अनेक प्रदर्शनात भाग घेऊन ३०० पेक्षा जास्त बक्षिसे व ३० पेक्षा जास्त ट्रॉफिज् मिळविल्या आहेत. यांपैकी ५ वेळा प्रदर्शनातील सर्वोत्कृष्ट फुलासाठीची किंग ऑफ द शो ट्रॉफी त्यांना मिळाली आहे. श्री. रविंद्र 'दि रोझ सोसायटी ऑफ पुणे' तर्फे दिल्या जाणाऱ्या रौप्यपदकाचा पहिला मानकरी आहेत. पुणे, मुंबई, नाशिकसह नागपूर, भोपाळ, हैद्राबाद, भुवनेश्वर व जबलपूर येथील राष्ट्रीय पातळीवरील गुलाब प्रदर्शनात परीक्षक म्हणून त्यांनी कामगिरी केली आहे. त्यांनी मार्गदर्शन केलेल्या अनेक व्यक्तींनीही खूप बक्षिसे मिळविली आहेत.

१९९२ पासून दि रोझ सोसायटी ऑफ पुणे या भारतातील सर्वात मोठ्या व सर्वात जुन्या संस्थेच्या कार्यकारिणीवर ते कार्यरत आहेत. ७ वर्षे दि इंडियन रोझ फेडरेशनच्या (सर्व रोझ सोसायट्यांची शिखर संस्था) कार्यकारिणीवर कार्यरत आहेत.

ऑल इंडिया रेडिओ, ई टीव्ही या वाहिन्यांवरून त्यांच्या मुलाखतींचे प्रसारण झाले असून इंडियन एक्स्प्रेस, सकाळ या वृत्तपत्रांमध्ये मुलाखती प्रसिद्ध झाल्या आहेत.

# विनम्र आवाहन

'आम्ही भिडे' अंकाद्वारे सातत्याने आपल्याशी संवाद साधण्यासाठी आम्ही करीत असलेल्या प्रयत्नांना आपल्या सहकार्याची जोड मिळाली तर भविष्यकाळात आपण त्याचे वितरण दरमहा सुद्धा करू शकतो. परंतु त्या करिता आपल्याकडून खालीलप्रमाणे सहकार्य हवे आहे -

१) 'आम्ही भिडे' मुखपत्रासाठी छोटे माहितीपूर्ण लेख, कविता, उल्लेखनीय कार्य, पुरस्कार, सन्मान, कुटुंबातील जन्म/मृत्यू इ.बाबत माहिती प्रतिष्ठानच्या ठाणे/पुणे कार्यालयात पाठवावी.

२) हा अंक मुख्यत: जाहिरातींवरच अवलंबून असल्यामुळे आपण करीत असलेल्या उद्योग/व्यवसायाची जाहिरात प्रसिद्धीसाठी द्यावी. (जाहिरात दर अंकात दिलेले आहेत.)

३) संपर्कासाठी बदललेले व अचूक पत्ते, ई-मेल, तसेच परदेशस्थ नातेवाइकांचे ई-मेल्स/पत्ते पाठवावेत.

४) भिडे माहेरवाशिणींनी आपला पत्ता आवर्जून पाठवावा.

५) 'आम्ही भिडे' अंकाचे वितरण विनामूल्य आहे, तरी सुद्धा जाहिरात आणि देणगीच्या स्वरूपात आर्थिक हातभार लावावा.

# कौतुक



राज्यभरात दुष्काळाच्या झळींची जाणीव फक्त विचारातच नाही तर ती कृतीत आणण्याचे काम भिड्यांच्या सुनेने म्हणजे डॉ. सौ. वसुधा विद्याधर भिडे, पुणे यांनी केले. दुष्काळी भागातील टँकरच्या मदती करिता त्यांनी आपल्या भागात आवाहन करताच महिलांकडून उत्स्फूर्तपणे मदत मिळाली.

दुष्काळग्रस्त वाड्या-वस्त्यांवर टँकर पुरविण्याच्या सहाय्यामध्ये आपणही खारीचा वाटा उचलूया, या दृष्टीने त्यांनी सहकारनगर भागातील महिला संस्थांशी संपर्क साधून त्या द्वारा सर्व महिला संस्थांच्या सभासदांशी संपर्क साधून मोठा मेळावाही आयोजित केला. दुष्काळी परिस्थितीत पिण्याचे पाणी व जनावरांसाठी चारा या दोन्हींच्या वितरणाची किती गरज आहे हे मेळाव्यात सांगितले. त्यांच्या या आवाहनाला उत्तम प्रतिसाद मिळाला. नुसती हळहळ व्यक्त करण्यापेक्षा आपल्यालासुद्धा कृती करणे आवश्यक आहे. हे सांगितल्यावर अगदी थोड्या कालावधीत एक लाख रुपयांच्यावर निधी जमा झाला आणि जनकल्याण समितीतर्फे टँकर पुरवठा आणि टाक्यांच्या वाटपाच्या कामासाठी हा निधी सुपूर्द केला. यामध्ये राष्ट्र सेविका समितीच्या शाखा किंवा कला क्रीडा केंद्र, प्रबोधन संस्कार केंद्र इत्यादी संस्थांच्या माध्यमातून भरीव मदत मिळाली. ही बाब भिडे परिवारास कौतुकास्पद आहे. वयाच्या ८० व्या वर्षी सुद्धा सामाजिक बांधिलकीच्या नात्यातून त्यांनी केलेले काम अभूतपूर्व असून नवीन पिढीने त्यांच्यापासून प्रेरणा घ्यावी असेच आहे.

**लहरोंसे डरकर नैय्या पार नही होती,**
**कोशिश करनेवालोंकी हार नही होती ।**

**ले. क. सुनील भिडे (पुणे)**
**९६२३०१७४४४**

## एप्रिल २०१३ ते जून २०१३ पर्यंतचे देणगीदार

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री. प्रदीप वासुदेव भिडे व डॉ. सौ. शीला भिडे, दिल्ली | रु. | ५,००,०००/- | शैक्षणिक निधी |
| २) श्री. संतोष भिडे, ठाणे | रु. | ८००/- | सभासद वर्गणी |
| ३) श्रीमती वैशाली भिडे, बंगलोर | रु. | ८००/- | सभासद वर्गणी |
| ४) श्री. सतीष भिडे, गिरगांव | रु. | १,०००/- | सभासद वर्गणी |
| ५) श्रीमती जयश्री प्र. भिडे, डोंबिवली | रु. | १,०००/- | सभासद वर्गणी |
| ६) श्री. उपेन्द्र प्र. भिडे, डोंबिवली | रु. | १,०००/- | सभासद वर्गणी |
| ७) सौ. वैशाली उपेन्द्र भिडे, डोंबिवली | रु. | १,०००/- | सभासद वर्गणी |
| ८) श्री. संजय शंकर भिडे, बांद्रा | रु. | १०,०००/- | देणगी |

## आवाहन

९ ऑक्टोबर २०११ रोजी पुणे येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभासद वर्गणी मधील १०० रु. चा सर्वसाधारण सभासद वर्ग रद्द केलेला आहे. त्यामुळे

**आश्रयदाता** - **रु. १०,०००/-**
**हितचिंतक** - **रु. ५,०००/-**
**आजीव सभासद** - **रु. १,०००/-**

हे तीनच वर्ग ठेवण्यात आलेले आहेत. तसेच या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये त्या अनुषंगे खालील निर्णय घेण्यात आला. ''जे सभासद १०० रुपये भरून सभासद झालेले आहेत, त्यांनी अधिक ९०० रुपये भरून आजीव सभासदत्व घ्यावे.'' अशा सभासदांना नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान ९०० रुपये भरून आजीव सभासदत्व घेण्याचे विनंतीपूर्वक आवाहन करीत आहे याची नोंद घ्यावी.

## सावरकर एकमेवाद्वितीय . . . .

१) हिंदुस्तानला संपूर्ण स्वातंत्र्य हवे अशी मागणी करणारे हे पहिलेच पुढारी. सन १९०० मध्ये त्यांनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली होती.

२) १८५७ च्या बंडास ''स्वातंत्र्ययुद्ध'' म्हणून गौरविणारे पहिलेच इतिहास संशोधक.

३) १८५७ च्या समरानंतर हिंदुस्तानातील जनतेला शमविण्यासाठी व्हिक्टोरिया राणीने काढलेल्या पत्रकास, ''मॅग्ना कार्टा'' ला ''एक भिकार चिट्टे'' म्हणून झिडकारणारे सावरकर पहिलेच, १९०० साली म्हणजे वयाच्या १७ व्या वर्षी . . .

४) देशभक्ती केली म्हणून ज्यांची बी. ए. ची पदवी काढून घेतली असे पहिले विद्यार्थी . . .

५) परदेशी मालाची होळी करणारे सावरकर हे पहिलेच पुढारी, सन १९०५ मध्येच त्यांनी परदेशी मालावर बहिष्कार व स्वदेशीचा पुरस्कार करण्याचा संदेश दिला, मात्र कॉंग्रेसच्या गांधींनी १९२१ साली सावरकरांचे हेच तत्त्व तंतोतंत उचलले आणि लोकप्रिय झाले.

६) परदेशी मालाच्या होळी मुळे देशभक्तीच्या कारणास्तव वसतीगृहातून काढून टाकलेले सावरकर हे पहिलेच विद्यार्थी . . . .

७) मे १९०९ मध्ये बॅरिस्टर होऊनही सनद दिली नाही असे सावरकर हे पहिलेच विद्यार्थी . . .

८) शत्रूच्या राजधानीत जाऊन (लंडन) त्यांच्या विरोधात युद्ध पुकारण्याची हिंमत ठेवणारे सावरकर हे पहिलेच . . .

९) शत्रूच्या ताब्यातून (मार्सेलिस बंदर) धाडसाने उडी मारून निसटण्याचा प्रयत्न केलेले सावरकर हे पहिलेच क्रांतिकारी . . .

१०) प्रसिद्धीपूर्वीच ज्यांचे ग्रंथ जप्त करण्यात आले असे पहिलेच क्रांतिकारक . . ११) शत्रूच्या राजधानीत जाऊन लंडनमधील १८५७ च्या स्वातंत्र्यसमराचा सुवर्णमहोत्सव साजरा करणारे सावरकर हे पहिलेच क्रांतिकारी . . .

१२) शिखांचा इतिहास लिहिणारे पहिले लेखक हे सावरकरच . . .

१३) स्वातंत्र्यलक्ष्याकडे जगाचे लक्ष वेधून घेण्याचा पराक्रम करणारे सावरकर हेच पहिले . . .

१४) भारतीय स्वातंत्र्यलक्ष्यासाठी सर्व देशातील क्रांतिकारकांची संघटना उभारणारे सावरकर हेच पहिले . . . त्यासाठी तुर्की, रशियन, आयरिश, इजिप्शियन, फ्रेंच इ. क्रांतिकारकांशी संपर्क केला होता . . .

१५) विसाव्या शतकात २ जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आलेले सावरकर हे एकमेव आणि फक्त सावरकरच . . .

१६) अंदमानच्या कारावासात भिंतीवर काट्याने आणि खिळ्याने महाकाव्य रचणारे महाकवी एकमेव सावरकर . . . तसेच सुमारे ६००० पंक्ती कोठडीत लिहिल्या. मुखोद्गत करून बाहेर आल्यावर प्रकाशित करण्याचा महापराक्रम करणारे एकमेव असे सावरकर . . .

१७) बालपणी वहिनी व बहिणीसोबत ओव्यांच्या भेंड्या खेळताना त्यात नवनवीन ओव्या रचून त्यात स्वातंत्र्याची प्रेरणा गुंफू पाहणारे सावरकर हेच एकमेवाद्वितीय . . .

१८) तुरुंगात असताना मराठी व्याकरणातील वृत्ते आठवत नाहीत म्हणून नवी वृत्ते रचून मराठी भाषेच्या व्याकरणात भर घालणारे सावरकर हेच एकमेव . . . व्याकरणात त्या वृत्तांना ''वैनायक'' म्हणून ओळखले जाते.

१९) अस्पृश्यांना रत्नागिरीत मंदिर प्रवेश मिळवून देणारे सावरकर हेच पहिले.

२०) एका अस्पृश्याने शंकराचार्यांच्या गळ्यात हार घालण्याची घटना घडविणारे सावरकर हेच पहिले . . .

२१) अस्पृश्य लोक स्पर्श करू शकतील असे मंदीर स्वखर्चाने बांधून घेणारे पहिले सावरकरच . . . कै. श्री. भागोजी कीर यांनी सावरकरांच्याच प्रेरणेतून रत्नागिरीत ''पतितपावन'' मंदीर बांधले.

२२)भाषाशुद्धीचे महत्त्व सांगणारे सावरकरच . . .


साप्ताहिक प्राजक्त
२८७, 'डी' वॉर्ड, कसबा गेट
गंगावेस रोड, कोल्हापूर.
फोन नं. ०२३१-२५४०८२७


## 'आम्ही भिडे' जाहिरात दरपत्रक

| | |
|---|---|
| १) त्रैमासिक/वार्षिक पूर्ण पान साधे (ब्लॅक ॲन्ड व्हाइट) | रु.२,०००/- |
| २) त्रैमासिक/वार्षिक अर्धेपान साधे (ब्लॅक ॲन्ड व्हाइट) | रु.१,०००/- |
| ३) त्रैमासिक/वार्षिक पाव पान साधे (ब्लॅक ॲन्ड व्हाइट) | रु.५००/- |
| ४) त्रैमासिक/वार्षिक शुभेच्छा पट्टी ब्लॅक ॲन्ड व्हाइट | रु.५००/- |
| ५) वार्षिक अंक प्रायोजकत्व | रु. ३०,०००/- |
| ६) त्रैमासिक अंक प्रायोजकत्व | रु. ८,०००/- |


प्रकाश प्रकाशनाचे हे साप्ताहिक प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७, 'डी' वॉर्ड, गंगावेस, कोल्हापूर येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.
मालक, संपादक, प्रकाशक : श्री. प्रफुल्ल डबीर RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI
(या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)